**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**
पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
१२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार—४२५४१२
☎ (०२५६४) २३०००९
✉dyspacbnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक १९/०६/२०२३.

## -: प्रेसनोट :-

**आलोसे श्री.भैय्यासाहेब दिगंबर निकुंभे, वय—५४ वर्षे, व्यवसाय—नोकरी, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, नंदुरबार (वर्ग ३) मुळ रा. प्लॉट नं २०, अरिहंत नगर, नंदुरबार ता.जि.नंदुरबार यांनी वेळोवेळी ५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन एकुण मागणी केलेली लाचेची रक्कम ५,०००/—रुपये स्विकारलेबाबत...**

| | |
|---|---|
| **घटक** | नंदुरबार |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | प्रक्रिया सुरू आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | आलोसे श्री.भैय्यासाहेब दिगंबर निकुंभे, वय—५३ वर्षे, व्यवसाय—नोकरी विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, नंदुरबार (वर्ग ३) मुळ रा. प्लॉट नं २०, अरिहंत नगर,नंदुरबार ता.जि. नंदुरबार |
| **वेळोवेळी एकुण मागणी केलेली लाचेची रक्कम** | ५०००/— रुपये (पाच हजार रुपये) |
| **एकुण मागणी केलेल्या रकमेपैकी आज रोजी स्विकारलेली लाचेची रक्कम** | ५०००/— रुपये (पाच हजार रुपये) |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांचे रनाळे खुर्द तालुका नंदुरबार शिवारातील शेतात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र अंतर्गत विहिर खोदुन मिळणेचे प्रकरण पंचायत समिती, नंदुरबार येथुन मंजूर करून देण्याचे मोबदल्यात एक महिन्यापुर्वी १०,०००/— रूपये लाचेची मागणी केली व त्याच दिवशी अॅडव्हॉन्स म्हणून ५०००/— रूपये घेतले होते. त्यानंतर तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयाकडे तक्रार दिलेनंतर दि. १२.०६.२०२३ रोजी पुन्हा पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री. निकुंभे, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, नंदुरबार यांनी पुन्हा उर्वरीत ५०००/— रूपये लाचेची मागणी केल्याचे पंच साक्षीदारांसमक्ष स्पष्ट झाले.<br>त्यानंतर आज दि. १९.०६.२०२३ रोजी नमुद लोकसेवक श्री. निकुंभे, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, नंदुरबार यांनी तक्रारदार यांचेकडून ५०००/— रूपये लाचेची रक्कम नंदुरबार पंचायत समिती कार्यालयाचे गेटच्या बाहेरील उजव्या बाजूस असलेल्या गणेश टी स्टॉल येथे पंच साक्षीदारांसमक्ष स्वीकारली असून सदर बाबत नंदुरबार शहर पोलीस स्टेशन, जिल्हा नंदुरबार येथे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही चालु आहे. |

| कामगिरी पथक | सदर कामगिरी मा.पोलीस अधीक्षक सो, श्रीमती. शर्मिष्ठा घारगे—वालावलकर, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, मा.अप्पर पोलीस अधिक्षक सो., श्री.माधव रेड्डी, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, पोलीस उपअधीक्षक, श्री.नरेंन्द्र पवार (वाचक) ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, पोलीस उपअधीक्षक, श्री.राकेश आनंदराव चौधरी, ला.प्र.वि., नंदुरबार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. समाधान एम. वाघ, श्रीमती. माधवी एस.वाघ, पोहवा/विलास पाटील, पोहवा/विजय ठाकरे, पोना/अमोल मराठे, पोना/संदीप नावाडेकर, पोना/देवराम गावीत, मपोना/ज्योती पाटील, पोना/मनोज अहिरे व चापोना/जितेन्द्र महाले अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार पथकाने केली आहे. |
|---|---|

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबाबत तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.

संपर्क पत्ता: ला.प्र.वि., नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : **acbnandurbar@gmail.com**
ई—मेल: **dyspacbnandurbar@mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : **acbnandurbar@gmail.com**
टोल फ्री क्रमांक : १०६४
दुरध्वनी क्रमांक : ०२५६४— २३०००९,२३१००९

(राकेश आनंदराव चौधरी) ९/०६/२३
पोलीस उप अधिक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार